# परिपत्रक

क्रमांक सीएलआर. ११९१/१५४६१/१५

मुंबई, २ ऑगस्ट सन १९९१.

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही अधीक्षकांच्या कार्यालयातून सीएल-२ अनुज्ञप्तीच्या मंजुरीच्या प्रस्तावासोबत, निरीक्षकांनी गोडाऊनच्या जागेची तपासणी केल्याबाबतचा, तपासणी अहवाल पाठविला जात नाही. तर काहींनी अहवाल पाठविला असता, त्यामध्ये गोडाऊनच्या चतुःसीमेला काय काय आहे याचा उल्लेख केलेला नसतो. तरी अधीक्षकांनी गोडाऊनच्या जागेची प्रत्यक्ष तपासणी करुन गोडाऊनच्या चारही दिशांना काय आहे, हे नकाशामध्ये दाखवून त्या संदर्भातील अहवाल पाठविणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र देशी दारु नियम १५ प्रमाणे गोडाऊनचे बांधकाम मजबूत असून, गोडाऊनला असलेल्या खिडक्या तारेच्या जाळीने कायम स्वरुपात बंद करणे आवश्यक आहे, व गोडाऊनला बाहेर एकच प्रवेशद्वार असावे. नकाशामध्ये गोडाऊनची हद्द ही लाल शाईने दाखविण्यात यावी. तरी अधीक्षकांनी, सीएल-२ अनुज्ञप्तीच्या मंजुरीचा प्रस्ताव पाठविताना वरील बाबींची खबरदारी घ्यावी.

[ पं. दा. सावंत ]
सह - आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
[ वर्धा सोडून ]